# वैधानिक लेखापरीक्षण अहवाल

संस्थेचे नांव :-बोधीसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे.

संस्थेचा नोंदणीकृत पत्ता :- पुणे. इंटरनॅशनल स्कूल, लेन नंबर १४,
आदर्शनगर, विदयानगर,
टिंगरे नगर, पुणे -४११०३२

संस्थेचा नोंदणी क्रमांक :- रजि.नं.पीएनए/जी/युनि/अर्बन/जीएनएल/
/[ओ]/१५७/२०२०-२१/दिनांक-२९/०९/२०२१

तपासणी मुदत दिनांक :- ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६

लेखापरीक्षण वर्ग :- ब

लेखापरीक्षण पूर्ण केल्याचा दिनांक: ३१-०७-२०२६

माधव बोन्हाडे अँड कंपनी
चार्टर्ड अकौंटंटंस्
ऑफिस नं.११ मांजरे कॉम्प्लेक्स,
चाकण, नाशिक रोड,
पुणे ४१०५०१

**MADHAV BORHADE & CO.**
CHARTERED ACCOUNTANTS
Add: Office No.11, Manjare Complex, Chakan, Pune Nashik Road, Pune – 410 501
Email: camadhavborhade@gmail.com , Mob No – 9689525820/8803312020

दिनांक: ३१-०७-२०२६

प्रति,
मा. चेअरमन / सचिव
बोधीसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित,
पुणे.

विषयः - संस्थेचा दि. ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ अखेर मुदतीचा शासकीय लेखापरीक्षण अहवाल पाठविणेबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मी आपल्या संस्थेची शासकीय हिशोब तपासणी दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या मुदतीची घेतली असून त्याचा लेखापरीक्षण अहवाल सोबत पाठविला आहे. सदर लेखापरीक्षण अहवालातील भाग अ, ब व क मधील दोषांची योग्य ती पूर्तता व सुचनांची अंमलबजावणी करुन त्यांचा दोष दुरुस्ती रिपोर्ट "ओ" नमुन्यात व्यवस्थापक मंडळाच्या ठरावासह तीन प्रतित व तीन महिन्याचे आत सादर करण्यात यावा.

माधव बोऱ्हाडे अँड कंपनी
चार्टर्ड अकौंटंटस

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE CHARTERED ACCOUNTANTS

NBorhade

(सी. ए. माधव के बोऱ्हाडे)
प्रोप्रायटर, पुणे
एम नंबर १८६०१४

**<u>प्रत-माहितीसाठी -</u>**
मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे.
मा. जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था, पुणे.

# वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल

[ कलम ८१ आणि नियम ६९ [३] नुसार]

प्रति,
मा. चेअरमन,
बोधीसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित,
पुणे.

संदर्भ – लेखापरीक्षक नेमणुक ठराव क्र. ८ , वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ०५-०९-२०२५

१]**आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैधानिक लेखापरीक्षकाचा अभिप्राय-**

मी आपल्या बोधीसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे संस्थेचे व संस्थेच्या सर्व शाखांचे दि. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरीक्षण केलेले असुन, त्यामधे दि. ३१/०३/२०२६ अखेरचा ताळेबंद, त्या दिनांकास संपणारे नफा तोटा पत्रक आणि त्यामध्ये समाविष्ट केलेल्या हिशोबाच्या धोरणाचा अर्थपुर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

२]**आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेले नियम या अन्वये आर्थिक विवरणपत्रके तयार करणेची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना ते अपहार किंवा चुक यामुळे होणा-या लक्षणीय चुकांपासुन मुक्त राहतील अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणने याचा समावेश असेल.

**लेखापरीक्षकाची जबाबदारी-**

३] आर्थिक हिशेबपत्रके बनविणे ही संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मतप्रदर्शन करणे हीआमची जबाबदारी आहे. मी शासकीय लेखापरीक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या तपासणीसाठी लागु असलेल्या मानदंडानुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था कायदयास अनुसरून केलेली आहे. ह्या मानदंडानुसार मला माझ्या तपासणीची आखणी आणि अंमलबजावणी अशा पध्दतीने करावी लागते की ज्या योगे ह्या हिशेबात लक्षणीय चुका नाहीत. ह्याची सर्वसाधारण अशी खात्री पटेल.

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

४] त्यासाठी माझ्या लेखापरीक्षणामध्ये आर्थिक पत्रकांमधे समाविष्ट असलेल्या रक्कमा व दाखविलेल्या माहिती संबंधित लेखापरीक्षण पुरावे जमा करणेची पध्दत आहे. सदर निवडलेली पध्दत ही लेखापरीक्षकाच्या अदांजावर तसेच आर्थिक विवरणपत्रकात अपहार किंवा दोषांमुळे होणा-या लक्षणीय चुकांमुळे तयार होणा-या या जोखीम मुल्यांकनावर अवलंबुन असते. सदर जोखीम मुल्यांकनाची तपासणी करत असताना व तपासणीची पध्दत निवडताना संस्थेने तयार केलेली आर्थिक पत्रके व त्याचे योग्य सादरीकरणसंबंधात संस्थेमधे असणा-या अंतर्गत नियंत्रणाचा लेखापरीक्षक विचार करतात. तसचे आमचे लेखापरीक्षणामध्ये प्रचलित हिशोबी धोरणांची अंमलबजावणी व व्यवस्थापनाने मांडलेले अंदाज हे सुकृतदर्शनी योग्य आहेत काय? त्याचप्रमाणे आर्थिक पत्रकांचे सर्वसाधारण योग्य असे सादरीकरण केलेले आहे किंवा नाही याचेही परीक्षण केले जाते.

५] माझ्या लेखापरीक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती, पुरावे व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

<u>अभिप्राय-</u>

६) माझ्या मते आणि आम्हास मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेल्या टिपणी या महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायदयानुसार तसेच संस्थांसाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामधे सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात,

१) ताळेबंदाचे बाबतीत दिंनाक ३१/०३/२०२६ ची संस्थेची आर्थिक स्थिती आणि

२) नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफा किंवा तोटा आणि रोकड प्रवाह (लागू असल्यास) यांच्या संदर्भात.

<u>इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अभिप्राय-</u>

७) संस्थेचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायदयातील तरतुदीनुसार तयार करणेत आलेली आहेत.

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

**<u>८] मी अहवाल देतो की-</u>**

A) माझ्या लेखापरीक्षणाच्या उददेशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहिती प्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत व ते पुरेशे आहेत.

B) आमच्या तपासणीतून जितपत दृष्टोपत्तीस येईल, त्याप्रमाणे संस्थेने केलेले व्यवहार हे संस्थेच्या अधिकार मर्यादेच्या आतील आहेत.

C) माझ्या लेखापरीक्षणाच्या उददेशासाठी संस्थेच्या सर्व कार्यालयाकडून व शाखांकडून मिळालेली सर्व प्रकारची कागदपत्रे पुरेशे आहेत.

९] आमच्या मते संस्थेचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे लागू असलेल्या हिशोबी मानंकानुसार आवश्यक ती पुर्तता करतात.

**<u>१०] मी पुढे असा अहवाल देतो की-</u>**

१) या अहवालासंदर्भातील ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे हिशोबाची पुस्तके व विवरणपत्रकानुसार जुळतात.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोपत्तीस येईल त्यावरून संस्थेने कायदयानुसार आवश्यक अशी योग्य ती हिशोबांची पुस्तके ठेवली आहेत.

३) संस्थेच्या शाखांचे हिशोबांचे तपासणी करुन आलेले लेखापरीक्षकाचे अहवाल हे आमचा लेखापरीक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेणेत आलेले आहेत.

४) संस्थेस चालू तपासणी कालावधीसाठी लेखापरीक्षण वर्ग 'ब' देण्यात येत आहे.

स्थळ: पुणे

दिनांक: ३१.०७.२०२६

UDIN:

माधव बोन्हाडे अँड कंपनी

चार्टर्ड अकौंटंटस

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE CHARTERED ACCOUNTANTS

(सी. ए. माधव के बोन्हाडे)

प्रोप्रायटर पुणे

# नमूना क्रमांक-१
# लेखापरीक्षा अहवाल (सर्व सहकारी संस्थासाठी)
## विभाग पहिला

संस्थेचे नांव : -बोधीसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे.

लेखापरीक्षा नोंदवहीप्रमाणे अहवालाचा अनुक्रमांक : - ०२

संस्थेचे संपूर्ण पत्ता : -पुणे इंटरनॅशनल स्कूल, लेन नंबर १४, आदर्शनगर, विदयानगर, टिंगरे नगर, पुणे -४११०३२

तालुक्याचा गट : - पुणे

जिल्हा : - पुणे

संस्थेचा नोंदणी क्रमांक : - १५७/२०२०-२०२१

संस्थेचा नोंदणी दिनांक : - २९.०९.२०२१

लेखापरीक्षण वर्ग : - ब

संस्थेचे कार्यक्षेत्र : - संपूर्ण पुणे जिल्हा भौगोलिक सीमेपुरते मर्यादित राहील.

गेल्या तीन वर्षांत देण्यात आलेले लेखापरीक्षा वर्ग : - ब

संस्थेच्या शाखा/दवाखाने यांची संख्या : - ०१

### <u>१. लेखापरीक्षा विषयी माहिती</u>

१. लेखापरीक्षा करणा-या अधिका-याचे

संपूर्ण नाव : - माधव बोऱ्हाडे अँड कंपनी

पदनाम : - चार्टर्ड अकौंटंटस्

मुख्यालय : - पुणे

२. चालू लेखापरीक्षणात समावेश करण्यात आलेला कालावधी : - ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६

३. दिनांक: -

१. लेखापरीक्षा सुरू केल्याचा व चालू ठेवल्याचा कालावधी: - ०१/०७/२०२६ ते २०/०७/२०२६

२. लेखापरीक्षा पूर्ण केल्याचा दिनांक : - २०/०७/२०२६

३. लेखापरीक्षा अहवाल सादर केल्याचा दिनांक : - ३१/०७/२०२६

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

## २. सभासदत्व: -

१. सभासद संख्या

| | |
|---|---|
| अ. व्यक्तिगत - सर्वसाधारण अ वर्ग | : - २०२० |
| २. नाममात्र व वर्ग | : - -- |
| ३. हित चिंतक | : - -- |
| ब. संस्था | --------------- |
| क. अन्य (अन्य सदस्यांची माहिती तपशिलवार द्यावी.) | |
| एकूण | : २०२० |
| २. नवे सभासद यथोचितरित्या करुन घेतले आहेत काय? त्यांनी प्रवेशशुल्क दिले आहे काय? | : - होय. |
| ३.त्यांचे लेखी अर्ज घेण्यात आले असून ते योग्य रितीने नियत क्रमांक केले आहेत काय? | : - होय. |
| ४.महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या १९६२ च्या कायदा कानूतील नियम ३२ आणि ६५ (१) अन्वये ठरलेल्या आय नमुन्यात सभासदांची नोंदवही ठेवली आहे काय? | : - होय. संगणकावर ठेवलेली आहे. |
| ५.महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या १९७१ च्या कानुतील नियम ३३ अन्वये जे या नमुन्यात सभासदांची यादी ठेवली आहे काय? | : - होय. |
| ६.मृत काढून टाकलेल्या वा राजीनामा दिलेल्या सभासदांच्या बाबतीत त्यांच्या नावापुढे वरीलप्रमाणे योग्य ती नोंद केली आहे काय? | : - होय. |
| ७.राजीनामे रीतसर आहेत काय आणि ते यथोचित रित्या स्विकारले आहेत काय? | : - होय. |
| ८.महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कानूतील नियम २५ प्रमाणे वारस नोमिनी नेमून दिले आहेत काय? आणि त्याची नोंद २६ व्या नियमाप्रमाणे सभासदांच्या नोंदवहीत यथोचित रीत्या केली आहे काय? | : - होय. |

## <u>३. भाग</u>

| | |
|---|---|
| १. भागांकरिता आलेले अर्ज बरोबर आहेत काय? | : - अशी प्रथा नाही. |
| २. भागांची नोंदवही अद्यावत लिहीली आहे काय? | : - होय<br>संगणकावर ठेवलेली आहे. |
| ३. भागांच्या नोंदवहींतील नोंदी किदीतील नोंदीशी जुळतात काय? | : - होय |
| ४. भागांची खतावणी अद्यावत लिहीली आहे काय? | : - होय |
| ५. भागाची एकूण खतावणी बाकी ताळेबंदातील भागभांडवलाच्या आकडयांशी जुळते काय? | : - होय |
| ६. भागधारकांना त्यांनी घेतलेल्या सर्व भागाबद्दल भागपत्रे दिली आहेत काय? | : - होय |

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE CHARTERED ACCOUNTANTS

७. भागांचे हस्तांतर (ट्रान्सफर) अगर त्यांची किंमत परत देणे या गोष्टी कायदा कानून व पोट नियम यांतील तरतूद प्रमाणे झाल्या आहेत काय? : - होय

**४. बाहेरील कर्ज**

१.पोट नियमाप्रमाणे संस्थेने कर्ज घेण्याची मर्यादा काय ठरविली आहे? : - भाग भांडवल +रि. फंड+ इ.निधी -साचलेले-तोटे यांचे १०पट [नियम ३५ प्रमाणे]

२.ती उत्संघीली गेली आहे काय? : - नाही

३.जर ती उल्लंघीली गेली असेल तर समक्ष अधिका-याकडून आवश्यक ती अनुज्ञा मिळविली आहे काय? : - लागू नाही

**५. सभा**

१. दिनांक द्यावेत

अ. वार्षिक सर्वसाधारण सभा : ०५-०९-२०२५

ब. विशेष सर्वसाधारण सभा : - --

२. लेखापरीक्षा कालावधीत भरलेल्या सभेची खालीलप्रमाणे संख्या : - --

अ. व्यवस्थापक समितीच्या व संचालक मंडळाच्या सभा : एकून ०८ सभा

ब. कार्यकारी उपसमितीच्या सभा : - --

क. अन्य सभा : - --

**६. दोष दुरुस्ती अहवाल**

१. संस्थेने गेल्या लेखापरिक्षा अहवालाचे दोष दुरुस्ती अहवाल पाठवले आहेत काय? असल्यास दिल्याचे दिनांक द्या नसल्यास ते न दिल्याबद्दलची कारणे द्या. : - सन २०२३-२४ & सन २०२४-२५ दोषांचा दुरुस्ती अहवाल जून २०२६ मध्ये प्राप्त झाला आहे. त्यातील काही दोषांची पूर्तता अद्याप प्रलंबित असून संस्थेने सदर दोषांची त्वरित दुरुस्ती करून घ्यावी.

२. मागील लेखापरीक्षा अहवालात नमूद केलेल्या काही महत्त्वाच्या मुद्यांकडे संस्थेने दुर्लक्ष केले आहे काय? तसे असेल तर सर्वसाधारण अभिप्रायात ते नमुद करा. : - होय शेरे पहा

**७. लेखापरीक्षा शुल्क**

१. शेवटच्या लेखापरिक्षा शुल्काची आकारणी रक्कम द्या कालावधीसाठी आकारले तो कालावधी लिहा. : - सन-२०२४-२५ ची लेखापरिक्षण : - फी रु.१५०००/-

लेखापरिक्षा शुल्क-वसूल झाल्याचा दिनांक, कोशागाराचे : - मे. माधव बोऱ्हाडे अँड कंपनी यांनी

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE CHARTERED ACCOUNTANTS

नाव आणि भरलेली रक्कम द्या — अदा

२. जर संस्थेने लेखापरीक्षा शुल्क भरले नसेल तर देणे असलेल्या लेखापरीक्षा शुल्काचा तपशिल वा न भरल्याची कारणे द्या. : - लागू नाही.

**<u>८. अंतर्गत वा स्थानिक लेखापरीक्षा</u>**

१. जर अंतर्गत वा स्थानिक लेखापरीक्षा झाली असेल तर ती

२. संबंधित लेखापरीक्षा व अंतर्गत लेखापरीक्षा यांचा समन्यय आहे काय? : - लागू नाही.

**<u>९. कार्यकारी संचालक व्यवस्थापक चिटणीस</u>**

१. व्यवस्थापक/कार्यकारी अधिकाऱ्याचे नाव : श्रीमती. पी जी गायकवाड

२. दरमहा वेतन व वेतनश्रेणी : रु. २१०००/-
वेतनश्रेणी

३. त्यांना अन्य भत्ते आणि सवलती आदि उपलब्ध केल्या असल्यास त्या लिहा. : - नाही.

४. ते संस्थेचे सभासद आहेत ते लिहा. : - नाही.

५. जर ते सभासद असतील तर त्यांनी कर्ज घेतले आहे काय किंवा उधार उचल सवलती दिल्या आहेत काय? : - नाही.

६. अन्य कोणत्या रकमा त्यांच्याकडून येणे असतील तर त्यांचा तपशील द्या. : - अन्य रक्कमा नाहीत.

ब. कर्मचा-यांसंबंधी त्यांची नावे, पचनाम, शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी व सध्याचे वेतन, देण्यात येणारे भत्ते, नेमणूकीची बीलेली जमानत आदी माहिती दर्शविणारी यादी मिळवा. : - कर्मचारी यादी सोबत जोडली आहे.

**<u>१०. उल्लंघन –</u>**

१. संस्थेजवळ आपले नोंदलेले पोट-नियम कायदा व कानू यांची प्रत आहे काय? : -पोटनियम प्रत आहे.

२. कायदा कानून व पोटनियम यांचे उल्लंघन झाल्याच्या नोंदी द्या : - भाग व शेरे यहा

१. कायदा कलम क्रमांक : - भाग व शेरे यहा

२. कानू क्रमांक : - भाग व शेरे यहा

३. पोट-नियम क्रमांक : - भाग व शेरे यहा

३. पोटनियमानुसार काही नियम तयार केले आहेत काय? : - नाही.
योग्य त्या अधिका-याकडून ते मान्य करुन घेतले आहेत काय?
त्यांचे प्रतिपालन योग्य रीतीने होत आहे काय?

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE CHARTERED ACCOUNTANTS

(उल्लंघनासंबंधी सर्वसाधारण अभिप्रायांची थोडक्यात चर्चा करावी.)

## ११. नफा आणि तोटा-

१. गेल्या सहकारी वर्षात किती नफा वा तोटा झाला? :- मागील सन-२०२४-२५ तोटा: रु. १९,२६,०२५.

२. निव्वळ नफ्याची विभागणी कशी केली ते लिहा :- तोटा असल्याने नफा वाटणी लागू नाही.

## १२. रोकड जमा बँकेतील शिल्लक आदि गुंतवणूकी (सिक्युरिटीज)

अ. रोकड जमा

१. शिल्लक मोजा व किर्दीवर शिल्लक मोजल्याचा दिनांक व रक्कम नमूद करुन सही करा. :- दि.३१/०३/२६ रोख शिल्लक :- रु. ४९६/-मोजून सही करण्यात आली.

२. रोख शिल्लक सादर करणाऱ्या व्यक्तीचे नाव व पद व पदनाम लिहा. :- श्री. पी जी गायकवाड, व्यवस्थापक

रोकड रक्कम ठेवण्याबाबत ते अधिकार आहेत काय? :- होय

३. किर्दीप्रमाणे रोकड रक्कम बरोबर आहे. :- होय

४. ने आण करताना आणि तिजोरीत ठेवलेल्या शिलकेच्या रकमेच्या सुरक्षिततेबाबत केलेली व्यवस्था पुरेशी आहे काय? :- नाही.

## ब. बँकेतील शिल्लक

बँकेचे पासबुकातील त्यांनी पाठविलेल्या पत्रकातील बँकेने दिलेल्या दाखल्यातील शिल्लक रकमा संस्थेच्या जमा खर्चाच्या वाक्याशी जुळतात काय? जर त्या जुळत नसतील तर मेळ पत्रके तपासा. :- होय

१. गुंतवणूक रोखे प्रत्यक्षात पहा आणि ते संस्थेच्या नावावर आहेत का ते पहा :- होय.

२. गुंतवणूकीवरील लाभांश व व्याज यथावह वसूल करण्यात येत आहे काय? :- होय.

३. जर गुंतवणूक रोख बँकेत ठेवले असतील तर त्याबाबतचे संबंधीत दाखले मिळविले आहेत काय? :- होय.

४. गुंतवणूकीची नोंदवही ठेवली आहे काय? व ती अद्यावत लिहील आहे काय? :- होय.

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

## १३. स्थावर व जंगम मालमत्ता

| | |
|---|---|
| १. संबंधीत नोंदवलेल्या आहेत काय? व त्या अद्ययावत लिहील्या आहेत काय? - | :-होय, संगणकावर आहेत. |
| २. मालमातेची यादी घेवून प्रत्यक्षात रुजावत घ्या ताळेबंदातील रकमेशी या बाक्या जमतात काय? | : - होय. |
| ३. जमीन आदी स्थावर मालमत्तेबाबत त्यांचे विलेख (दस्तऐवज) पहा व ते संस्थेच्या नावावरच आहेत का ते पहा | : - होय. |
| ४. झीज (घसारा) | |
| १. घसार यथावत आकारला आहे काय? | : - होय. |
| २. मालमत्तानिहाय घसारा दर नमुद करा | : - संगणक ४०%, फर्निचर १०% |
| १४. लेखापरीक्षा अहवालाच्या मसुद्यावर व्यवस्थापनाशी चर्चा मंडळ या व्यवस्थापन समिती यांच्याशी चर्चा केली आहे काय? नसल्यास कारणे सांगा | :- होय चेअरमन, उपाध्यक्ष व व्यवस्थापक यांचेशी चर्चा केलेली आहे. |

स्थळ: - पुणे
दिनांक ३१.०७.२०२६

माधव बोऱ्हाडे अँड कंपनी
चार्टर्ड अकौंटंस्

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE CHARTERED ACCOUNTANTS

(सी. ए. माधव के बोऱ्हाडे)
प्रोप्रायटर पुणे

## बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित पुणे

### परिशिष्ट

यादी नं १. कायदा कानू व पोटनियम बाह्य यादी

| अ. नं | पान नं व तारीख | रक्कम रु. पैसे | व्यवहाराचा तपशील | शंकांचे स्वरूप व उल्लेखिलेल्या कायदा कानू पोटनियमाचा तपशील | गुंतवलेली रक्कम रु. पैसे | वसुली अथवा कार्यवाही संबंधि शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| -------- भाग ब मध्ये स्वतंत्र तपशील नमूद केलेला आहे.------------- | | | | | | |

यादी नं. २ ज्या रक्कमा हिशोबात घेणे आवश्यक होते व घेतल्या गेल्या नाहीत अशा रक्कमांचा तपशिल

| अ.नं | जमा पावती व तारीख | प्रत्यक्ष मिळालेली रक्कम | संस्थेस येणे असलेल्या रक्कमा व कमी जमा झालयाच नाहीत अशा व्यवहाराचा तपिशल | मिळावयास पाहिजे असलेली रक्कम | कमी जमा झालेली अगर हिशोबात न घेतलेली रक्कम | उपस्थित केलेल्या आपेक्षाचे स्वरूप | करावयाची कार्यवाही, वसुल करावयाची रक्कम इ. संबंधी अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| -------- अशा रक्कमा नाहीत.--------------- | | | | | | | |

यादी नं.३ अयोग्य व बेकायदा दिलेल्या रक्कमा

| पावती नं व दिनांक | दिलेल्या रक्कमा | व्यवहाराचा तपशिल | उपस्थित केलेल्या आक्षेपाचे स्वरुप | करावयाची कार्यवाही वसूल करावयाची रक्कम इ. |
|---|---|---|---|---|
| ------ अशा रक्कमा नाहीत.--------------- | | | | |

यादी नं.३ (अ) वसुल करावयाच्या रक्कमा बाबत गैरप्रकार

| रक्कम दिल्याचा दिनांक | ऋणकोचे नाव | येणे रक्कम | करावयाची कार्यवाही वसूल करावयाची रक्कम इत्यादी संबंधित अभिप्राय |
|---|---|---|---|
| ------ अशा रक्कमा नाहीत.--------------- | | | |

यादी नं.४ संशयीत व बुडीत कर्ज

| खाते प्रकार | कर्जदारांचे नाव | येणे रक्कम | संशयित वाटणारी रक्कम | बुडीत वाटणारी रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| ---------------सोबतच्या यादीप्रमाणे--------------- | | | | | |

यादी नं.४ (अ )प्रत्यक्ष वसूल होण्यास संक्षित वाटणारी स्थावर व जंगम मालमत्ता व इतर जिंदगी ची यादी

| धारण केलेल्या मालमत्तेचा तपशील | खरेदीचा व संपादनाचा दिनांक | पुस्तकी रक्कम | वसूल होणारी संभाव्य रक्कम | अंदाजे तोटा | करावयाची कार्यवाही वसूल करावयाची रक्कम इत्यादी |
|---|---|---|---|---|---|

--------------- अशी मालमत्ता नाही ---------------

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE CHARTERED ACCOUNTANTS

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (२) नुसार १ ते ९ बाबीचे विवेचन

| अ.नं. | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १. | कोणतीही ऋणे असल्यास, त्यांच्या बराच काळ थकलेल्या रक्कमा | ताळेबंदाप्रमाणे |
| २. | रोख शिल्लक व कर्जरोखे आणि संस्थेच्या मालमत्ता व दायित्वे यांचे मुल्यांकन. | लागू नाही. |
| ३. | प्रतिभूतिंच्या आधारे संस्थेने दिलेले कर्ज व आगावू रक्कमा आणि घेतलेली ऋणे योग्य प्रकारे प्रतिभूत करण्यात आलेली आहेत. किंवा कसे आणि अशा त-हेने दिलेली कर्जे किंवा आगावू रक्कमा किंवा घेतलेली ऋणे ज्या अटीवर देण्यात वा घेण्यात आलेली असतील त्या अटी संस्थेला व तीच्या सदस्यांच्या हितसंबंधाना बाधक ठरणा-या आहेत किंवा कसे | होय.<br>नाही. |
| ४. | केवळ पुस्तक नोदणीद्वारे संस्थेकडून केले जाणारे व्यवहार संस्थेच्या हितसंबंधाना बाधक ठरणारे आहेत किंवा कसे | नाही. |
| ५. | संस्थेने दिलेली कर्जे व आगावू रक्कमा ठेवी म्हणून दाखविण्यात आल्या आहेत काय. | नाही. |
| ६. | वैयक्तीक खर्च महसुली लेख्यावर भारीत करण्यात आला आहे काय. | नाही. |
| ७. | आपल्या उदिष्टांच्या पुरःसरणार्थ संस्थेला काही खर्च आला आहे काय. | नाही. |
| ८. | शासन किंवा शासकिय उपक्रम अथवा वित्त संस्था यांनी संस्थेला ज्या उदिष्टांच्या पुततेसाठी सहार्य दिले असेल त्यांच्या साठीच त्या सहाय्यच्या योग्य प्रकार वापर संस्थेने केला आहे काय. | लागू नाही.<br>असे अर्थ सहाय्य प्राप्त झालेले नाही. |
| ९. | संस्था सदस्यांबाबतची आपली उददीष्टये व आबंधने योग्य प्रकारे पार पाडत आहे किंवा कसे | होय. |

BODHSATVA

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

# बोधीसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे.
# वैधानिक लेखापरीक्षण अहवाल
# (दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६)

प्रति,

मा. चेअरमन/सचिव,

बोधीसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे.

महोदय,

बोधीसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसधारण सभा दि. ०५/०९/२०२५ ठराव क्र. ८ अन्वये आपल्या संस्थेचे लेखापरिक्षण करणेकामी नेमणुक झालेवरुन मी आपल्या संस्थेचे ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या मुदतीचे वैधानिक लेखापरिक्षण संस्थेने तयार ठेवलेल्या व हजर केलेल्या हिशोबाच्या पुस्तकावरुन व कागद पत्रकावरुन तसेच आम्हास दिलेल्या तोंडी माहिती वरुन व खुलाशावरुन लेखापरिक्षण पूर्ण केले आहे. या संबंधीचे आमचे अभिप्राय खालील प्रमाणे भाग अ, ब व क मध्ये नमुद करीत आहोत, लेखापरिक्षणासाठी सादर केलेल्या रेकॉर्ड आणि खुलासा या व्यतिरिक्त अन्य काही रेकॉर्ड असल्यास किंवा अप्राप्त खुलासे असल्यास व त्यामध्ये भविष्यात काही बाबी उदभवल्यास किंवा नंतर काही गैरप्रकार/गैरव्यवहार उघडकीस आल्यास तसेच संस्थेची वर्तमान आर्थिक स्थिती संचालक मंडळ किंवा अधिकारी व कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे अथवा कर्तव्यातील कसुरीमुळे भविष्यात संस्था अडचणीत आल्यास त्यास सर्वस्वी संस्थेचे संचालक मंडळ, कर्मचारी सामुदायिक रित्या जबाबदार राहतील याची नोद घेवून कर्तव्य दक्षता बाळगणे आवश्यक राहील.

तपासणी कालावधीत संस्थेचे चेअरमन म्हणून श्री. मोरेश्वर सुखदेवे व व्हा. चेअरमन म्हणून श्री. गौतम मगरे यांनी दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ पर्यंत काम पाहिले असून ते समाधानकारक आहे. संस्थेचे दैनंदिन कामकाज संस्थेचे उपाध्यक्ष श्री. गौतम मगरे व त्यांचे सहकारी वर्ग यांचे मदतीने केलेले आहे व ते समाधानकारक आहे.

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

BODHISATVA

# भाग अ

## १. लेखापरीक्षण अहवाल -अ (को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ऑडीट मॅन्युअल नुसार)

१. आर्थिक गैरव्यवहार/अफरातफर-

लेखापरीक्षण मुदतीत आर्थिक गैरव्यवहार, अफरातफर अथवा अपहार आढळुन आलेला नाही.

२. निधी व मालमत्तेचा गैरवापर

लेखापरीक्षण मुदतीत निधी व मालमत्तेचा गैरवापर करण्यात आलेला नाही.

३. निधीचा गैरविनियोग-

लेखापरीक्षण मुदतीत निधीचा गैरविनियोग आढळून आलेला नाही.

४. दिशाबुल होणारे हिशोब लिहीणे-

लेखापरीक्षण मुदतीत अशा प्रकारचे दिशाभुल होणारे हिशोब लिहील्याचे आढळुन आलेले नाहीत. भाग क पहावे.

५. खोटे हिशोब तयार करणे-

लेखापरीक्षण मुदतीत खोटे हिशोब लिहील्याचे आढळुन आलेले नाहीत.

६. कमी केलेल्या खर्चाच्या तरतुदी-

लेखापरीक्षण मुदतीत केलेल्या तरतुदीमध्ये कमतरता आढळुन आलेली नाही.

७. कायदा, नियम, पोटनियम व परिपत्रके यांचे उल्लंघन झाल्याच्या गंभीर बाबी-

तपासणी मुदतीत कायदा, नियम, पोटनियम व परिपत्रके यांचे गंभीर स्वरुपात उल्लंघन झालेले नाही.

८. शासकिय भाग भांडवल, कर्ज अनुदान यांचा गैरविनियोग/दुस-या कारणासाठी वापरणे-

लेखापरीक्षण मुदतीत अशा प्रकारच्या रक्कमा संस्थेस प्राप्त झालेल्या नाहीत.

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE CHARTERED ACCOUNTANTS

BODHISATVA

९. वैयक्तीक खर्च नफा तोटा खात्यास नावे टाकला-

लेखापरीक्षण मुदतीत वैयक्तीक खर्च नफा तोटा खात्यास नावे टाकलेला नाही.

१०. हातावर शिल्लक ठेवावयाची रोख रक्कम मर्यादा उल्लंघन कलम १०७ क-

तपासणी मुदतीत हातावरील रोख शिल्लक मर्यादिचे उल्लंघन झालेले नाही.

११. निमय १०७ ड नुसार २० हजारापेक्षा अधिक रोख रक्कम अदा करतांना ती क्रॉस चेकनेच देण्यात यावी-

लेखापरीक्षण मुदतीत अशा प्रकारच्या रक्कमा दिलेल्या नाहीत.

१२. राखीव किंमती. पेक्षा कमी किंमती मध्ये बँकेची मालमत्ता विकणे-

लेखापरीक्षण मुदतीत राखीव किमतीपेक्षा कमी किमतीने मालमत्ता विकल्याचे आढळून आले नाही.

१३. बँकेच्या बाबतीत्त मर्यादिपेक्षा अधिक रक्कमेचा कर्जपुरवठा करणे-

लेखापरीक्षण मुदतीत मर्यादिपेक्षा अधिक रक्कमेचा कर्जपुरवठा केलेला नाही.

१४. विनातारणी कर्ज मंजुर करताना बँकेच्या बाबत आरबीआय च्या नियमांचे व इतर संस्थांच्या बाबतीत पोटनियमातील मर्यादिपेक्षा अधिक कर्ज देणे-

लेखापरीक्षण मुदतीत मर्यादिपेक्षा अधिक कर्ज दिलेले आढळुन आलेले नाही.

१५. कलम ४३ व नियम ३५ मधील तरतुदीचे उल्लंघन करुन बाहेरील कर्ज उभारणे-

लेखापरीक्षण मुदतीत संस्थेने कलम ४३ व नियम ३५ मधील तरतुदींचे उल्लंघन करुन बाहेरील कर्ज/ठेवी स्विकारलेल्या नाहीत.

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

BODHISATVA

१६. नियम क्रं. २३ प्रमाणे मुल्यांकन करुन भागाची रक्कम परत करणे-

लेखापरीक्षण मुदतीत संस्थेने भागाची रक्कम परत करतांना ती मुल्याकंन करुन परत केलेली आहे.

१७. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांचे कडून बाजार भावापेक्षा अधिक दराने खरेदी करणे-

लेखापरीक्षण मुदतीत संस्थेने सदस्य / त्यांचे नातेवाईक यांचेकडून खरेदी केलेली नाही.

१८. किमान एक वर्षाचे वरील थकबाकीदारा विरुध्द वसुलीसाठी कोणतीही कारवाई न करणे-

लेखापरीक्षण मुदतीत एक वर्षाचे वरील थकबाकीदार सभासदांवर वसुलीसाठी कारवाई केलेली आहे. सोबत यादी जोडलेली आहे.

स्थळ: - पुणे
दिनांक ३१.०७.२०२६

माधव बोन्हाडे अँड कंपनी
चार्टर्ड अकौंटंस्

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

MBorhade

(सी. ए. माधव के बोन्हाडे)
प्रोप्रायटर पुणे

BODHISATVA

भाग ब

सभासद संख्या, दप्तरी कामकाज, संचालक मंडळ सभा, आर्थिक व सांपत्तीक स्थिती, ताळेबंद विवेचन, नफा तोटा, कायदा कानु व पोटनियम उल्लंघन इ. बाबत.

१. सभासदः

दि. ३१/०३/२०२५ अखेर संस्थेची सभासद संख्या १,९७१ होती. सन २०२५-२६ मध्ये प्रवेश ४९ यांचा विचार करता दि. ३१/०३/२०२६ रोजी एकूण सभासद संख्या २,०२० इतकी संस्थेच्या दप्तरी असलेल्या यादी प्रमाणे बरोबर आहे. संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० व अधिनियम १९६१च्या नियम क्र. ३२ आणि ६५/१] अन्वये सभासद नोंदवही आय नमुन्यात ठेवलेली आहे. तसेच सभासद यादी जे नमुन्यात संगणकावर ठेवलेली असून त्यामधील सर्व नोंदी पुर्ण करण्यात याव्यात व सर्व सभासदांची वारस नोंद करण्यात यावी.

२. अंतर्गत नियंत्रणः

अ) वार्षिक सर्वसाधारण सभा-

तपासणी कालावधीत संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ०५-०९-२०२५ रोजी घेण्यात आली. सभेत जास्तीत जास्त सभासद हजर राहतील या दृष्टीने उपाययोजना करावी. सभेमध्ये विषयपत्रीकेप्रमाणे सर्व विषयावर चर्चा होऊन ठराव पास करण्यात आले.

**३. संचालक मंडळ सभा विवेचनः**

संस्थेचे एकुण संचालक मंडळ १५ सदस्यांचे असून तपासणी कालावधीत ०९ जुलै २०२५ पासून पाच वर्षाच्या कालावधीसाठी नवनिर्वाचित संचालक मंडळाची निवड करण्यात आली आहे. सदर यादी अहवालासोबत जोडलेली आहे. तपासणी मुदतीत संचालक मंडळाच्या एकूण ०८ सभा घेण्यात आलेल्या आहेत. संचालक मंडळ सभेत विषयपत्रिकेप्रमाणे विषयांवर चर्चा करून सर्वानुमते ठराव संमत करणेत आले आहेत.

संचालक मंडळाच्या २० जुलै २०२५ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ५ नुसार, दापोडी रुग्णालयातून प्राप्त होणारे उत्पन्न त्या रुग्णालयावर करण्यात येणाऱ्या खर्चापेक्षा कमी असल्यामुळे संस्थेचा निधी दापोडी रुग्णालयाच्या खर्चासाठी वापरण्यास डॉ. आनंद जोगदंड यांनी विरोध नोंदविला.

संचालक मंडळाच्या १३ जून २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ७ नुसार, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थेस रु. १९,२६,०२५ इतका तोटा झाला होता. दि. १२ मार्च २०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेतील ठराव क्र. १० नुसार, दापोडी रुग्णालयामुळे झालेल्या तोट्याच्या अनुषंगाने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये संचालकांकडून प्राप्त झालेली रु. १०,९५,००० इतकी ठेव सर्व संचालकांच्या मंजुरीने सदर तोट्याविरुद्ध समायोजित करण्यात आली. तसेच, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये दापोडी रुग्णालयासाठी

BODHSATVA

MADHAV BORHADE & CO.
FRN
148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

संचालकांकडून रु. ९,००,००० इतकी ठेव प्राप्त झाली असून सदर रक्कमही सर्व संचालकांच्या मंजुरीने संस्थेच्या संचित तोट्याविरुद्ध समायोजित करण्यात आली. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये रु. १९,९५,००० इतकी रक्कम सर्व संचालकांच्या मंजुरीने नफा-तोटा खाते व ताळेबंदामध्ये समायोजित करण्यात आली.

**<u>४. दप्तरी कामकाज-</u>**

तपासणी कालावधीत संस्थेचे दैनंदिन आर्थिक व्यवहार व कामकाज व्यवस्थापक म्हणून श्रीमती. पी. जी गायकवाड इतर कर्मचा-यांच्या मदतीने दप्तरी कामकाज केलेले आहे. संस्थेचे हिशोबी पुस्तके व कामकाज संगणीकृत्त पध्दतीने ठेवलेले आहे. तपासणी कालावधीत केलेले दप्तरी कामकाज समाधानकारक आहे.

**<u>५. दोष दुरुस्ती अहवालः -</u>**

संस्थेने सन २०२३-२४ व २०२४-२५ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालावरील दोष दुरुस्ती अहवाल नमुना 'ओ' मध्ये दि. ३० जून २०२५ रोजी सादर केला. त्यातील काही दोषांची पूर्तता अद्याप प्रलंबित असून संस्थेने सदर दोषांची त्वरित दुरुस्ती करून त्याबाबतचे आवश्यक पुरावे सादर करावेत.

**<u>६. ताळेबंद विवेचनः-</u>**

**अ. भांडवल व देणी बाजू -**

<u>१. वसूल भाग भांडवल: रु. १,९९,०५,०००</u>

दि. ३१/०३/२०२५ अखेर वसूल भागभांडवल रु. १,९५,२०,००० होते. सन २०२५-२६ मध्ये रु. ३,८५,००० वाढ होऊन दि. ३१/०३/२०२६ अखेर रु. १,९९,०५,००० इतके वसुल भाग भांडवल सोबत जोडलेल्या शेअर्स यादीप्रमाणे बरोबर आहे. सभासदांना शेअर्स सर्टिफिकेट वाटप करण्यात यावे.

<u>२. शेअर्स अनामत: रु. ०</u>

दि. ३१/०३/२०२५ व दि. ३१/०३/२०२६ रोजी शेअर्स अनामत शिल्लक रु. ० आहे.

<u>३. राखीव निधी व इतर निधी: रु. ३१,०२०; संचित तोटा: रु. ११,२६,३९६</u>

दि. ३१/०३/२०२५ रोजी राखीव निधी व इतर निधी रु. ३१,०२० आणि संचित तोटा रु. १९,२६,०२५ होता. दि. ३१/०३/२०२६ रोजी राखीव निधी रु. ३१,०२० व संचित तोटा रु. ११,२६,३९६ आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील रु. ७,९९,६२९ इतका अधिशेष संचित तोट्यात समायोजित केल्यानंतर दि. ३१ मार्च २०२६ अखेर संचित तोटा रु. ११,२६,३९६ इतका राहिला आहे. सदर समायोजन नफा-तोटा खाते व ताळेबंदातील शिल्लकीशी जुळते.

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

BODHISATVA

४. संचालक ठेव: रु. ०;  नफा-तोटा खात्यात संचालक योगदान: रु. १९,९५,०००

दि. ३१/०३/२०२५ अखेर संचालक ठेव रु. १०,९५,००० होती व दि. ३१/०३/२०२६ रोजी शिल्लक ० आहे. चालू वर्षी संचालक योगदान रु. १९,९५,००० उत्पन्नात जमा केले आहे.

५. सभासद अनामत: रु. १,००,०००

दि. ३१/०३/२०२५ व दि. ३१/०३/२०२६ अखेर सभासद अनामत रु. १,००,००० आहे.

६.इतर देणे व तरतुदी: -

१. लेखापरिक्षण फी - १५,०००/-

दि.३१.३.२०२६ अखेर वैधानिक लेखापरिक्षण फीसाठी ची तरतूद केली आहे. संबंधितास खात्री करून रक्कम अदा करणेत यावी.

२. प्रोफेशनल टॅक्स देणे - रु. ८००/-

दि.३१.३.२०२६ अखेर प्रोफेशनल टॅक्स पेऐबल देणे रु. ८००/- दिसत असून शासकीय देणी वेळेत अदा करणेत यावी.

३. इतर देणे - भाडे- १,४०,०००/-, पगार रु. २४,५००/-, सल्लागार शुल्क रु. ७२,५००/- व  खर्चाची प्रतिपूर्ती (टी.डि.एस.) रु. २२,५००/-

दि.३१.३.२०२६ अखेर भाडे, पगार, सल्लागार शुल्क व  खर्चाची प्रतिपूर्ती (टी.डि.एस.) देणे दिसत असून संबंधितांना खात्री करुन अदा करण्यात यावी.

४. मेडिकल शॉप डिपॉझिट: रु. ०

दि. ३१/०३/२०२५ अखेर मेडिकल शॉप डिपॉझिट देणे रु. १८,००,००० होते व दि. ३१/०३/२०२६ रोजी शून्य आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मेडिकल शॉपची रु. १८,००,००० इतकी ठेव मेडिकल शॉप चालविणाऱ्या व्यक्तीस परत करण्यात आली. त्यामुळे दि. ३१ मार्च २०२६ रोजी सदर ठेवीची शिल्लक रु. ० आहे.

MADHAV BORHADE & CO.
FRN
148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

BODHISATVA

## ब. जिंदगी व येणी-

### १. रोख व बँकेतील शिल्लका-

अ. रोख शिल्लक: रु. ४९६

दि. ३१/०३/२०२६ रोजी आर्थिक पत्रकानुसार हातावरील रोख शिल्लक रु. ४९६ इतकी असून रोज किर्दीप्रमाणे बरोबर आहे.

ब. बँक शिल्लका: रु. १३,४५,३३५

दि. ३१/०३/२०२६ रोजी विविध बँक खात्यांतील एकूण शिल्लक रु. १३,४५,३३५ एवढया असून ते बँक ताळमेळपत्रक व पासबूक प्रमाणे बरोबर आहेत. बँक खात्यांचा तपशील खालीलप्रमाणे.

१. पीडीसीसी बँक: रु. २,४०,२१२

२. स्टेट बँक ऑफ इंडिया: रु. १,३२,९८२

३. एचडीएफसी बँक: रु. ५,८९,४८१

४. इंडियन बँक: रु. ३४,४७९

५. येस बँक: रु. ३,४८,१८१

**२. मुदत ठेवीतील गुंतवणूक:** रु. १,४७,१९,०६०

| अ.नं. | तपशिल | दि.३१/०३/२०२५ | दि.३१/०३/२०२६ | वाढ /घट |
|---|---|---|---|---|
| १. | पीडीसीसी बँक | २६,३९,६३३ | २८,५१,३९२ | वाढ |
| २. | स्टेट बँक ऑफ इंडिया | ५५,३८,६२४ | २९,३३,९९६ | घट |
| ३. | एचडीएफसी बँक | २९,४५,७२७ | ३१,२५,१६९ | वाढ |
| ४. | इंडियन बँक | २७,९५,२०९ | २५,००,००० | घट |
| ५ | येस बँक | ३१,०२,६९३ | ३३,०८,५०३ | वाढ |
| | **एकुण** | **१,७०,२१,८८६** | **१,४७,१९,०६०** | **घट** |

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE CHARTERED ACCOUNTANTS

दि. ३१/०३/२०२५ अखेर गुंतवणूक रु. १,७०,२१,८८६ होती. सन २०२५- मध्ये निव्वळ रु. २३,०२,८२६ घट होऊन दि. ३१/०३/२०२६ रोजी गुंतवणूक रु. १,४७,१९,०६० आहे. गुंतवणुक नोंदवही पासबुकाप्रमाणे शिल्लका बरोबर आहेत.

**<u>३. कर्ज व आगाऊ रक्कम:</u>** रु. १०,५१,०००

सदर रक्कम ही टिंगरे नगर येथील कार्यालयासाठी रु. ५१,०००/- व दापोडी येथील रुग्णालयासाठी १०,००,०००/-ठेव स्वरूपात देण्यात आलेली आहे.

**<u>४. स्थावर व जंगम मालमत्ता:</u>** रु. ८,४६,०९४

सदर रकमेमध्ये फर्निचर व फिक्चर्स रु.८,३६,०८१/- व मोबाईल रु. १०,०१३/-समावेश आहे. मालमत्तेवर घसारा आकारणी केली असून ती योग्य आहे.

**<u>५. बँक टीडीएस येणे:</u>** रु. १,०८,०६७

दि.३१/०३/२६ अखेर बँक टीडीएस येणे रु. १,०८,०६७/- एवढा दिसत आहे. सदर रकमेचा आयकर विवरण पत्र सादर करुन पूर्तता करावी.

**<u>६. गुंतवणुकीवरील येणे व्याज:</u>** रु. ३,१९,१००

दि.३१/०३/२६ अखेर बँक ठेवीवरील येणे व्याजाची तरतूद केली असून सदर रक्कम रु. ३,१९,१००/-एवढी असून सदर रक्कम जमा झालेनंतर योग्य तो जमाखर्च करणेत यावा.

**<u>७. नफा तोटा पत्रक विवेचन-</u>**

सन २०२५-२६ ताळेबंद रु. २,०३,११,३२० वर जुळतो. एकूण उत्पन्न रु. ५५,६९,३१८, अधिशेषापूर्व खर्च रु. ४७,६९,६८९ व अधिशेष रु. ७,९९,६३० आहे. प्रमुख उत्पन्नामध्ये दापोडी संकलन रु. १८,४७,८८१, व्याज रु. १०,८०,६२४ व वार्षिक वर्गणी रु. ४,७९,००० आहे; प्रमुख खर्चामध्ये भाडे रु. १७,१०,०००, व्यावसायिक शुल्क रु. ९,४१,६८२ आणि वेतन/भत्त रु. ७,५९,२३० आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये झालेल्या एकूण रु. ४७,६९,६८९ खर्चापैकी दापोडी रुग्णालयावर रु. ३६,५२,३४६ इतका खर्च करण्यात आला.

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

**८. कायदा कानू पोटनियम उल्लंघन**

तपासणी कालावधीत खालील बांबीचे उल्लंघन झालेले असून भविष्यात ते होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

| अ.नं. | कलम | कानु | पोटनियम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | - | - | ३(१२) | सभासदांना भाग दाखले देणेबाबत. |
| 2 | - | - | ६(२), ७अ, ७ब, ४७(२) व ४७(४) | संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतूद क्र. 6(2), 7-अ, 7-ब तसेच 47(2) व 47(4) नुसार प्रत्येक सभासदाने प्रतिवर्षी रु. 2,000 इतकी वार्षिक वर्गणी दि. 30 सप्टेंबरपूर्वी भरणे अनिवार्य आहे. तथापि, काही सभासदांकडून वार्षिक वर्गणी प्राप्त होणे अद्याप बाकी आहे. |

**९. ऑडीट वर्ग -**

तपासणी कालावधीत संस्थेची आर्थिक स्थिती, दप्तरी कामकाज, व्यवस्थापन, अंतर्गत नियंत्रण, कर्ज वसुली, आर्थिक उलाढाल, येणे देणे, संस्थेस झालेला नफा, थकबाकी व लेखापरिक्षण वर्गवारीचे निकषाचे अवलोकन करुन संस्थेस सन-२०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षण **'ब'** वर्ग देण्यात येत आहे.

**१०. समारोप-**

तपासणीच्या वेळी संस्थेचे चेअरमन, उपाध्यक्ष व सेवक वर्ग यांनी केलेल्या सहकार्याबददल मी आभारी आहे.

स्थळ: पुणे
दिनांक:- ३१.०७.२०२६

माधव बोन्हाडे अँड कंपनी
चार्टर्ड अकौंटंस्

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

(सी. ए. माधव के बोन्हाडे)
प्रोप्रायटर, पुणे

BODHISATVA

**भाग-क**

तपासणी कालावधीत आढळून आलेल्या काही दोषांची वेळीच पुर्तता करून घेण्यात आली च ज्यांची पुर्तता होऊ शकली नाही त्या दोषांचा तपशिल खालील प्रमाणे असून त्याची पुर्तता करावी व भविष्यात असे होणार नाही याची दक्षता घ्यावी,

१. सर्व सभासदांना शेअर्स सर्टिफिकेट देण्यात यावेत.
२. संस्थेने मुख्य उददेश लवकरात लवकर कार्यान्वित करुन त्यापासून संस्थेस उत्पन्न निर्माण करावे.
३. संस्थेच्या मंजूर उपविधीतील तरतूद क्र. 6(2), 7-अ, 7-ब तसेच 47(2) व 47(4) नुसार प्रत्येक सभासदाने प्रतिवर्षी रु. 2,000 इतकी वार्षिक वर्गणी दि. 30 सप्टेंबरपूर्वी भरणे अनिवार्य आहे. तथापि, काही सभासदांकडून वार्षिक वर्गणी प्राप्त होणे अद्याप बाकी आहे. त्यामुळे संस्थेने सभासदनिहाय बाकी वर्गणीचा तपशील तयार करून संबंधित सभासदांना स्मरणपत्रे पाठवावीत आणि वर्गणी प्राप्तीसाठी नियमित पाठपुरावा करावा.

MADHAV BORHADE & CO.
FRN 148279W
PUNE
CHARTERED ACCOUNTANTS

स्थळ: पुणे
दिनांक: - ३१/०७/२०२६

BODHISATVA

# Bodhisatva Sahakari Rugnalaya Maryadit Pune

## Profit & Loss A/c

### for the year ended 31.03.2026

| Expenditure | 1.04.2024 to 31.03.2025 | 1.04.2025 to 31.03.2026 | Income | 1.04.2024 to 31.03.2025 | 1.04.2025 to 31.03.2026 |
|---|---|---|---|---|---|
| Bank charges | 14,811 | 15,193 | **Interest Received On FD** | | |
| | | | PDCC | 192,852 | 201,015 |
| Salary & Allowance of Staff | 1,846,020 | 759,230 | SBI | 397,514 | 273,955 |
| | | | HDFC | 189,010 | 199,003 |
| Travelling Expenses to staff | 30,133 | 36,215 | Indian Bank | 205,002 | 179,807 |
| | | | YES Bank | 223,538 | 226,844 |
| Rent Rates & Taxes | 1,430,000 | 1,710,000 | **Sub Total** | **1,207,916** | **1,080,624** |
| Rates & Taxes | 15,329 | 16,116 | | | |
| Postage Telegram & telephone charges | 38,764 | 43,043 | Interest Received on Income Tax Refund | 4,741 | 6,635 |
| | | | Membership Fees | 1,117,000 | 49,000 |
| Printing & Stationery | 165,959 | 95,306 | Donation | 243,607 | 91,000 |
| | | | Directors Contribution | - | 1,995,000 |
| | | | Camp Collection | 30,433 | 20,178 |
| Audit Fees | 15,000 | 15,000 | Dapodi Hospital Collection | 891,748 | 1,847,881 |
| | | | Yearly Subscription | 147,000 | 479,000 |
| Depreciation on Assets | 117,486 | 110,534 | | | |
| | | | Net Loss | 1,926,025 | - |
| **Other Expenses** | | | | | |
| Advertisement | 90,636 | 22,440 | | | |
| AGM Expenses | 45,893 | 59,429 | | | |
| Consulting Charges | - | 396,480 | | | |
| Consumables | 135,019 | 56,568 | | | |
| Dapodi Hospital Repairs, Maintenance & Labour Charges | 722,063 | 143,841 | | | |
| Election Expenses | - | 38,194 | | | |
| Housekeeping & Maintenance | 58,830 | 29,414 | | | |
| Hospitality | 8,811 | 18,534 | | | |
| Lab Charges | 57,410 | 24,140 | | | |
| Maintance for Tingare Nagar OPD | 33,000 | - | | | |
| Mhada Expenses | 27,100 | - | | | |
| Miscellaneous Expenses | 26,433 | 32,763 | | | |
| Professional Fees | 112,513 | 941,682 | | | |
| Software Expenses | - | 18,006 | | | |
| Staff Welfare Expenses | 29,170 | - | | | |
| Power & Fuel/Electricity Charges | 68,482 | 125,008 | | | |
| Registration Charges | 479,608 | 62,553 | | | |
| **Surplus** | - | **799,630** | | | |
| **Total** | **5,568,470** | **5,569,318** | **Total** | **5,568,470** | **5,569,318** |

Mrs.Pallavi Gaikwad
Manager

Dr.Moreshwar Sukhdeve
Chairman

Prof. Gautam Magare
Vice Chairman

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE

For Madhav Borhade & Co.
Chartered Accountants

(Madhav K. Borhade)
Proprietor-M.No.186014

UDIN: 26186OVTGR1452

# Bodhisattva Sahakari Rugnalaya Maryadit Pune

## (B) Form 'N'

## Balance Sheet

### As at 31st March 2026

| Liabilities | 31.03.2025 | 31.03.2026 | Assets | 31.03.2025 | 31.03.2026 |
|---|---|---|---|---|---|
| **Share Capital** | | | **Cash / Bank Balance** | | |
| | | | Cash in Hand | 220 | 496 |
| Authorised Capital | 50,000,000 | 50,000,000 | **Cash at Bank** | | |
| 10000 Shares of Rs 5000/- each | | | PDCC | 362,356 | 240,212 |
| Issued Capital | 19,520,000 | 19,905,000 | SBI | 493,518 | 132,982 |
| Share Anamat | - | - | HDFC Bank | 59,039 | 589,481 |
| Reserve Fund & other Fund | 31,020 | 31,020 | Indian Bank | 5,171 | 34,479 |
| | | | Yes Bank | 139,776 | 348,181 |
| Duties & Taxes | 3,700 | 800 | | | |
| Provisions | 196,568 | 274,500 | | | |
| Director Anamat | 1,095,000 | - | **Investment** | | |
| Members Anamat | 100,000 | 100,000 | Fixed Deposit In HDFC | 2,945,727 | 3,125,169 |
| Medical Shop Deposit | 1,800,000 | - | Fixed Deposit In Indian Bank | 2,795,209 | 2,500,000 |
| | | | Fixed Deposit In PDCC Bank | 2,639,633 | 2,851,392 |
| | | | Fixed Deposit In SBI Bank | 5,538,624 | 2,933,996 |
| | | | Fixed Deposit In Yes Bank | 3,102,693 | 3,308,503 |
| | | | | | |
| | | | Tingare Nagar Opd & Dapodi Hospital Deposits | 1,051,000 | 1,051,000 |
| | | | | | |
| | | | **Current Assets** | | |
| | | | **TDS Receivable** | | |
| | | | PDCC | 19,284 | 20,102 |
| | | | SBI | 39,754 | 27,398 |
| | | | HDFC Bank | 18,901 | 19,900 |
| | | | Indian Bank | 20,502 | 17,982 |
| | | | Yes Bank | 22,354 | 22,684 |
| | | | | | |
| | | | Sundry Debtors | - | 695,773 |
| | | | | | |
| | | | **Interest accrued on FD** | | |
| | | | SBI | 272,427 | 119,576 |
| | | | HDFC | 30,681 | 30,342 |
| | | | PDCC | 8,669 | 8,843 |
| | | | Yes Bank | 41,887 | 40,237 |
| | | | Indian Bank | 161,411 | 120,103 |
| | | | | | |
| | | | **Fixed Assets** | | |
| | | | Furniture & Fixture | 923,489 | 836,081 |
| | | | Mobile | 16,688 | 10,013 |
| | | | Software | 11,250 | - |
| | | | | | |
| | | | EMD Mhada | 100,000 | 100,000 |
| | | | | | |
| | | | **Other Items** | | |
| | | | Accumulated Loss | 1,926,025 | 1,126,396 |
| | | | | | |
| **Total** | **22,746,288** | **20,311,320** | **Total** | **22,746,288** | **20,311,320** |

Mrs.Pallavi Gaikwad
Manager

Dr.Moreshwar Sukhdeve
Chairman

Prof. Gautam Magare
Vice Chairman

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, बोधिसत्व, पुणे

MADHAV BORHADE & CO. FRN 148279W PUNE

For Madhav Borhade & Co.
Chartered Accountants

(Madhav K. Borhade)
Proprietor-M.No.186014

UDIN: 26186OYTQR1452
Date: 31-07-2026